# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 23/03/2021 (मंगळवार)

(सकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. कळमेश्वर :– फिर्यादी सुमीत कृष्णाजी कोठाडे, वय 19 वर्ष, रा. कोलबास्वामी विद्यालय जवळ, दौलत ठुणे यांचे घरी, धापेवाडा खुर्द त. कळमेश्वर जि. नागपुर तसेच आरोपी नामे– 1) मंगेश शेषराव कोठाडे वय 42 वर्ष, 2) सचिन शंकर वैद्य, वय 32 वर्ष, 3) शुभम लहु ढोले, वय 20 वर्ष, 4) गौरव लहु ढोले, वय 23 वर्ष व विधीसंघर्षग्रस्त बालक, वय 15 वर्ष, सर्व रा. धापेवाडा खुर्द त. कळमेश्वर जि. नागपुर हे सर्व दि. 21/03/2021 रोजी फिर्यादी यांचे काका यांच्या मुलाच्या लग्नात गेले होते. अंतर्गत 8 कि.मी अंतरावर धापेवाडा खुर्द वार्ड क्र. 5 दौलत ठुणे यांचे घरी येथे दिनांक 22/03/2021 चे 13.30 वा. दरम्यान जागेच्या वादातून वरील आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवून, धारदार शस्त्र, लाकडी काठया व लोखंडी रॉडसह फिर्यादीच्या घरी जावुन वाद घातला. तसेच आरोपीतांनी फिर्यादीला काल लग्नाला का आला होता? असे म्हणुन शिवीगाळ केली. तसेच आरोपीतांनी फिर्यादीची आई सौ. मंदाताई कृष्णाजी कोठाडे वय 54 वर्ष यांना 'तुला आता जिवंत ठेवणार नाही कापुनच टाकतो' असे बोलले. तसेच आरोपीतांनी फिर्यादीच्या आईला जिवंत ठार मारण्याचे उद्देशाने धारदार शस्त्राने वार करून जखमी केले तसेच फिर्यादीला लोखंडी रॉड व लाकडी काठयांने मारहाण करून ठार मारण्याचे उद्देशाने मारहाण केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम 143, 147, 148, 149, 307, 324, 323, 504, 506 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. खडसे 9421050370 हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर